

# डायबेटिक न्युरोपथी समजणे

डायबेटिक न्युरोपथी म्हणजे नसांची हानी जी डायबीटिस असणाऱ्या लोकांमध्ये होते. काळानुसार उच्च रक्त शर्करा आणि रक्तामध्ये चरबीच्या उच्च मात्रा यांमुळे डायबेटिक न्युरोपथी होऊ शकते.

**असे असल्यास डायबीटिक न्युरोपथीची जोखिम वाढते**

- कोरोनरी हृदय रोग
- मद्य किंवा मद्य पान करणे
- वारंवार धूम्रपान करणे
- फार वजन असणे
- उच्च रक्तदाब आणि उच्च प्रमाणात कोलेस्ट्रॉल
- बळावलेला मूत्रपिंडांचा आजार

## डायबेटिक न्युरोपथीशी संबंधित लक्षणे

डायबेटिक न्युरोपथी मध्ये लक्षणे सामान्यपणे स्पर्श, वेदना , तापमान आणि इतर संवेदनांशी निगडित असतात.

- पाय आणि पायांच्या बोटांमध्ये विशेषत: सुन्नपणा
- झिणझिण्या किंवा जळजळण्याची भावना
- तीव्र, टोकदार वेदना जी रात्री वाढू शकते
- माकडहाड, नितंब किंवा मांडीमध्ये वेदना
- मांडीचे स्नायू अशक्त होणे आणि आखडणे
- बसलेल्या स्थितीमधून उठण्यास त्रास होणे
- अल्सर्स, संसर्ग, पायाच्या आकारामध्ये बदल आणि हाड आणि सांध्यांची हानी अशा पायांच्या समस्या
- तापमानामधील बदल समजण्याची क्षमता हरवणे
- तोल जाणे, पडण्याची जोखिम वाढणे आणि चाल बदलणे

तुमच्या रक्त शर्करा पातळ्या तुमच्या रक्त चरबी पातळ्या(कोलेस्ट्रॉल) आणि रक्त दाब लक्ष्य मर्यादेमध्ये ठेवण्यामुळे तुमची न्युरोपथीची लक्षणे सुधारण्यात मदत होईल आणि नसांची हानी होण्याची गतीही कमी होईल.

## डायबेटिक न्युरोपथी इतकी वेदनाकारक का असते?

नसा मेंदू मधून आणि कडून केमिकल संदेशांचे वहन करीत असतात. डायबेटिक न्युरोपथी मध्ये, नसांच्या संदेशा मध्ये अडथळा येतो, ज्यामुळे सुन्नपणा, झिणझिण्या , जळजळणे आणि अस्वस्थता होतात. काही जणांना ही वेदना वाटू शकते जे क्लेशदायक असते आणि याच्या मुळे एकंदर स्वास्थ्यावर परिणाम होत असल्याचे माहित आहे.




**वेदनांचे डॉक्टर (पेन फिझिशियन )डायबेटिक न्युरोपथी शी संबंधित वेदनेवर उपचारासाठी विशेष (स्पेशलाइझ्ड) उपाय पुरवून मदत करू शकतात .**

**वेदनांचे डॉक्टर (पेन फिझिशियन)** औषधे आणि मिनिमली इनव्हेझिव पेन अँड स्पाइन इंटरव्हेन्शन्स (MIPS) विकसित करून विशिष्ट उपचार प्लॅन पुरवतील.



**वेदनेची औषधे /ॲनलजेसिक्स / अँटी न्युरोपथिक औषधे**

- वेदना कमी करतात



**मिनिमल इनव्हेझिव पेन अँड स्पाइन इंटरव्हेन्शन (MIPS)**

- एपिड्युरल स्टीरॉइड इंजेक्शन्स
- पेरिफेरल नर्व्ह मॉड्युलेशन
- स्पाइनल कॉर्ड स्टिम्युलेशन


Issued in Public Interest by

Program sponsored by
Mylan Pharmaceuticals Pvt. Ltd.
A Viatris Company
VIATRIS